# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार
क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र : १७/२०२४/नंदुरबार

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. कैलास मोठाभाऊ भदाणे,<br>मु.पो. उंभर्टी, ता. साक्री, जि. धुळे-४२४३०६. | वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल नवापुर (प्रा.)यांचे कार्यालय, नवापुर, ता. नवापुर, जि. नंदुरबार. |

**सुनावणी दिनांक १६/०७/२०२५**

तक्रारदार यांनी दिनांक ०३/०१/२०२४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १६/०७/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती ऑनलाईन उपस्थित होते. तर तक्रारदार व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक ०३/०१/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "दि. ०२/११/२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देवूनही माहिती न देणाऱ्या, दिशाभूल करणारी व खोटी माहिती देणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार दंड व कलम २०(२) नुसार शास्तीची कार्यवाही करावी. अर्जातील विषयानुसार मला आवश्यक असलेली माहिती त्वरीत देणेसाठी जन माहिती अधिकारी यांना आदेश द्यावे. सोबतच मला झालेल्या आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रासापोटी मला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(८)(ख) नुसार रुपये १०,०००/- (दहा हजार रुपये) नुकसान भरपाई देण्यात यावी."

३) तक्रारदार यांनी दि. २९/०८/२०२३ रोजीच्या माहिती अर्जान्वये पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती. "श्रीमती एस.सी. अवसरमल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे प्रशिक्षण पुर्ण केल्याचा दिनांक/ कालावधी/प्रशिक्षण घेतल्याचे ठिकाण/ त्यासाठी आलेला एकुण खर्च/ बिल पावत्या तसेच शासनाने त्यांना दिलेले नियुक्ती पत्र/ नियुक्ती केलेल्या आदेशाची प्रत प्रमाणपत्र याची सविस्तर माहिती देण्यात यावी. माहिती इलेक्ट्रानिक्स स्वरुपात संगणकात/ संकेतस्थळावर उपलब्ध असेल तर त्याचा सांकेताक क्रमांक तारीख व त्याची लिंक देण्यात यावी. अथवा त्याची प्रिंट काढुन घ्यावी. मला ईमेलवर पाठवावी. माहिती अधिकाराचा लोगो सहित साक्षांकित करुन घ्यावी.

"जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने तक्रारदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. ०९/१०/२०२३ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केलेला आहे."

४) सुनावणीदरम्यान सादर केलेला युक्तिवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव) नंदूरबार यांचेकडे दाखल केलेला दि.

०९/१०/२०२३ चा प्रथम अपील अर्ज खालील आदेश पारीत करुन दि. ०२/११/२०२३ रोजी निकाली काढल्याचे दिसून येते.

"जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल नवापुर प्रा यांना आदेशित करण्यात येते की, अपीलकार यांचे मुळ अर्ज दि. २९/०८/२०२३ रोजीचा नुसार देय व उपलब्ध माहिती १० दिवसांत विनामुल्य पुरविण्यात यावी."

प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि. ०२/११/२०२३ च्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेत.

## आदेश

(१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल नवापुर (प्रा.)यांचे कार्यालय, नवापुर, ता. नवापुर, यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षण (प्रादेशिक व वन्यजीव), नंदुरबार यांच्या दि. ०२/११/२०२३ अन्वये पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

(२) प्रथम अपील सुनावणीवेळी कार्यरत (दि. ०२/११/२०२३ रोजी कार्यरत) जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल नवापुर (प्रा.)यांचे कार्यालय, नवापुर, ता. नवापुर, यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(३) वरील निर्देशांसह सदर तक्रार क्र. १७/२०२४/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

**प्रत :- माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित**

सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव), नंदुरबार.

जावक क्र 20C

01 JAN 2026